International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.4 Mar-Apr 2025

# "स्त्रियांच्या कथालेखनातील पुरुष"

**प्रा.संतोष बोंगाळे[1],वर्षा विद्याधर देसाई[2]**
[1]सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड ता. कराड जि. सातारा
[2]श्री शिव छत्रपती कॉलेज जुन्नर,पुणे
**Email**: ssbvcck@gmail.com
**Corresponding Author: प्रा.संतोष बोंगाळे**
**DOI- 10.5281/zenodo.19085765**

**सारांश (Abstract)**

मराठी साहित्यात स्त्रीवादी जाणीवा प्रगल्भ झाल्यानंतर स्त्री लेखिकांनी आपल्या लेखनातून केवळ स्त्रियांच्याच व्यथा मांडल्या नाहीत, तर पुरुषांच्या व्यक्तिमत्त्वाचेही सूक्ष्म पदर उलगडले आहेत. प्रस्तुत शोधनिबंध 'स्त्रियांच्या कथालेखनातील पुरुष' या विषयाचा वेध घेताना, स्त्रियांच्या नजरेतून पुरुष प्रतिमा कशी बदलत गेली, याचे विश्लेषण करतो. प्रारंभीच्या कथांमध्ये पुरुष प्रामुख्याने पितृसत्ताक व्यवस्थेचा प्रतिनिधी, सत्ताधारी आणि कठोर गृहप्रमुख म्हणून चित्रित झाला होता. मात्र, उत्तर-आधुनिक काळातील गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे आणि मेघना पेठे यांसारख्या लेखिकांनी पुरुषांच्या मानसिक द्वंद्वांना आणि त्यांच्यातील संवेदनशीलतेला वाचा फोडली आहे. या कथांमध्ये पुरुष केवळ शोषक नसून, तो कधी सहप्रवासी, कधी मित्र तर कधी व्यवस्थेचा बळी ठरलेला माणूस म्हणून समोर येतो. बदलत्या सामाजिक संदर्भात स्त्री-पुरुष नातेसंबंधांमधील सत्तासंघर्ष आणि त्यातून निर्माण होणारी पुरुषांची अगतिकता लेखिकांनी वास्तववादी पद्धतीने मांडली आहे. हा शोधनिबंध विविध कथांच्या आधारे पुरुषत्वाच्या पारंपारिक चौकटींना छेद देणाऱ्या या नव्या चित्रणाचे मूल्यमापन करतो. स्त्रियांनी रेखाटलेला हा पुरुष अधिक मानवी आणि वास्तववादी असून, तो लिंगभावाच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून समजून घेण्याचा प्रयत्न करतो, असा निष्कर्ष या प्रबंधातून मांडण्यात आला आहे.

**की वर्ड:** स्त्रीवादी जाणीव, पुरुष प्रतिमा, पितृसत्ताक पद्धती, लिंगभाव चित्रण, स्त्री-पुरुष नातेसंबंध, संवेदनशीलता, मराठी लघुकथा

**प्रास्ताविक**

भारतीय परंपरेने स्त्रियांना जरी देवतास्वरूप मानलेले असले तरीही मानवजातीच्या इतिहासाइतकाच स्त्रीजातीवरील अत्याचार सनातन आहे. राजा राममोहन रॉय ह्यांच्यापासून महर्षी कर्वे ह्यांच्यापर्यंत समाजसुधारकांनी स्त्रियांच्या दास्यविमोचनाची चळवळ चालवली आणि या चळवळींची फलश्रुती म्हणजे स्त्रियांना शिक्षण मिळू लागले व त्यांच्या अनुभूतीचे क्षितिज विस्तारले. आज २१ व्या शतकात एस. टी. वाहकापासून पायलट या पदापर्यंत तिने झेप घेतलेली असली तरीही तिला पुरुषापेक्षा नगण्यच लेखले जाते. घरसंसार व नोकरी दोन्ही सांभाळण्याची जीवघेणी कसरत तिला करावी लागते. अशा नोकरदार सामान्य स्त्रीच्या वाट्याला काहीवेळा लैंगिक व भावनिक पिळवणूकही येते आणि त्यातूनच त्यांना स्वतःचे अनुभव कागदावर उतरण्याची स्फूर्ती मिळते. अशाच काही स्त्रियांनी आपली सुख-दुःखे, आपल्या अनुभूती, भोवतालची सुख-दुःखं मराठी कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र यातून शब्दवध्द करण्याचा प्रयत्न केला आणि त्यातूनच मराठी साहित्यप्रांगणात स्त्रियांच्या लेखनाची नवी भर पडत गेली. प्रस्तुत लेखात आपण मराठी साहित्यातील स्त्रियांच्या कथालेखनाचा थोडक्यात आढावा घेऊन त्यातील पुरुषप्रतिमेचा शोध घेणार आहोत.

स्त्रियांच्या कथालेखनातील पुरुष: विषय विवेचन

मराठी कथेच्या शतकाच्या वाटचालीत स्त्रियांनी केलेले योगदान महत्वपूर्ण आहे. 'शतकाच्या वाटचालीत स्त्री-कथाकारांनी पुरुषांच्या कथेत न आलेले काही खास असे स्त्रियांचे अनुभव मांडलेले आहेत. याचबरोबर स्त्रीपुरूषभेदाच्या पलीकडे जाऊन कलावंत म्हणून जीवनातील काही विलक्षण आणि मौलिक अनुभवही त्यांनी कथांतून शब्दबध्द केलेले आहेत. '(1)हरिभाऊ आपटे यांच्या कथालेखनाला जी मोठी लोकप्रियता मिळाली ती तपासून प्रेरणा घेऊन अनेक स्त्रिया कथालेखन करू लागल्या. १८९६ मध्ये शांताबाई या लेखिकेने लिहिलेली 'बिचारी आनंदीबाई' ही स्त्रीने लिहिलेली पहिली कथा, तर लक्ष्मीतनया यांचा १९१५ साली प्रसिध्द झालेला 'सद्यःस्थिती' हा कथासंग्रह स्त्रियांचा पहिला कथासंग्रह म्हणावा लागेल.'आरंभकाळातील या कथालेखिका ज्या कौटुंबिक

वातावरणात वावरल्या वाढलेल्या होत्या, ते वातावरण पारंपरिक होते. त्यावर सुधारणावादाचा म्हणावा तसा पगडा नव्हता, त्यामुळे स्त्रीसुधारणावादाचे जे नवे वारे त्याकाळात वाहात होते, त्याचे दर्शन काही कथांमधून घडते'. (2)परंतु इतर कथांच्या तुलनेत अशा कथांची संख्या खूपच कमी असलेली दिसते. विधवांचीप्रवृत्तीच्या व्यक्ती आलेल्या आहेत. पण त्यांच्या कथात्म लेखनाचा महत्वाचा विशेष म्हणजे त्यांनी फक्त स्त्रीलाच केंद्रवर्ती कल्पून आपल्या कथा लिहिल्या. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये पुरुषांना मिळावे तेवढे प्राधान्य मिळू शकत नाही. स्त्रियांचेच प्रश्न त्यांच्याच वेदना याकडे जास्त लक्ष दिल्यामुळे पुरुषांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते. स्त्रियांचे व्यक्तिचित्र रेखाटत असताना किंवा स्वभाव रेखाटन करत असताना जेवढा काळ तो पुरुष आला असेल तेवढेच त्याचे दर्शन : लेखिकांनी पुरुषांना गौण स्थान दिल्यामुळे केवळ अल्पावधीसाठीच त्यांचे चित्रण येते 'चित्रीचीही स्त्री पाहू नये' हा पुरुषकेंद्री आदेश मनावर बिंबल्यामुळे पुरुषांची विकृत प्रवृत्ती तेवढीच स्त्रियांच्या समोर होती, त्यामुळे स्त्रियांच्या लेखनातून त्यांना नेहमी दुय्यम स्थान मिळत गेले. परंतु पुरुषांच्या लेखनाचा विचार करता त्यांनी आपल्या लेखनातून स्त्रियांना कुठेही कमी लेखलेले नाही. त्यांच्या बहुतांशी नायिका स्त्रियाच असतात आणि त्यासुध्दा पतिव्रता, सालस, भोळी, घरच्या सगळया नियमांचे न चुकता पालन करणारी घरची लक्ष्मी, मात्र पुरुष नायक म्हणून खूपच कमी वेळा येताना दिसतो. असे जरी असले तरी, स्त्रियांच्या कथालेखनातील पुरुषचित्रणांचा विचार करत असताना एक महत्वची गोष्ट जाणवते ती म्हणजे पुरुषांच्या चांगल्या-वाईट दोन्ही बाजू स्त्रियांच्या कथांमधून येताना दिसतात. हा त्यांच्या पुरुषचित्रणाचा एक विशेषच म्हणावा लागेल.

स्त्रियांच्या कथेतील पुरुषांच्या चित्रणांचा विचार करता त्यांच्या कथात्म साहित्यात वेगवेगळया स्वभावची, वेगवेगळया प्रवृत्तींची, वेगवेगळया संस्कृतीतील पुरुषपात्रे आपल्याला भेटतात. त्यामध्ये काही चांगले मित्र म्हणून येतात, काही फसवणारे, दोन-दोन विवाह करणारे पुरुष येतात. काही फक्त पुरुषी वर्चस्व गाजवणारे दिसतात तर काही भावाबहिणीसाखे प्रांजळ नाते निभावणारे पुरुषही त्यांच्या कथांतून भेटतात. स्त्रीला फक्त भोगवादी वस्तू म्हणूनच पाहणारा, गर्भार अवस्थेतही बायकोला भोगणारा, भिकारीण, भंगीण यांचा उपभोग घेणारा व बायको अशक्त झाल्यावर ते पांढरं फटफटीत मढं हवयं कुणाला म्हणून सोडचिठ्ठी देण्याचा निर्धार करणारा वसुधा पाटील यांच्या 'आनंदवन' मधील राक्षसीवृत्तीचा फौजदार म्हणा किंवा सोनासारख्या प्रेयसीबरोबर काही दिवस राहून, " लग्नाची बायको घेऊन समाजात मिरवता येते मात्र प्रेमाची बायको घेऊन समातात मिरवता, वावरता येत नाही" म्हणून तिला न सांगता दुसऱ्या मुलीशी लग्न करून मोकळा होणारा गौरी देशपांडेच्या 'ओहोटी' कथेतील आधुनिक विचारांचा राम म्हणा हे असे लोक आपमतलबी, फक्त स्वतःच्या स्वार्थीचा विचार करणारे भोगवादी पुरुष म्हणून समोर येतात, तर केवळ पैसेवाले स्थळ बघून अशक्त मुलाबरोबर लग्न रेणालियाच्याबरोबरच सोन्याताण्याला सुनावणारा व तिला हाकून परागंदा होणारा प्रियकराला हपापलेले व त्यासाठी स्वतःच्या बहिनीचा मी सापलाही मागेहरे पुरुष उर्मिला सिकर यांच्या 'लाव्हा' सारख्या कथेतून पाहावयास मिळतात.

भोगवादी पुरुषीवृत्तीचे दर्शन करायचे असेल तर प्रिया तेंडूलकरांच्या कथा वाचणेच आवश्यक आहे. एका 'एअर होस्टेस' शी लगट करणारा व रात्री तिचे शरीर ओरबाडणे एवढीच आपली जबाबदारी मानणारा भोगवादी पुरुष (सॉरी फॉर लास्ट नाईट) शरिर उपभोगाच्या अपेक्षेने तात्पुरत्या लग्नाची लालूच दाखवणारा पुरुष (नकटीच्या लमाला), त्याशिवाय रात्री-बेरात्री प्रवास करणाऱ्या स्त्रियांची फाजील चेष्टा करणारे पुरुष अशा वेगवेगळया भोगवादी पुरुषप्रतिमा त्यांच्या कथांमधून पाहावयास मिळतात. यातून स्वीकडे स्त्रीत्वाऐवजी केवळ मादी म्हणून पाहणारी पुरुषीसंस्कृती समोर येते. काहीवेळा जन्मदाता बाप असूनही स्वतःच्या मुलीच्या मानसिकतेचा विचार न करू शकणारा पुरुषही त्यांच्या काही कथातून दिसतो. अशावेळी नायिकेला प्रश्न पडतो, 'हेच का माझे बाबा? मी फ्रॉकमध्ये असताना तू माझे सर्वस्व आहेस म्हणणारे ? माझ्या लग्नात फुटून रडणारे ? एका तासापूर्वी मी मांडलेला संसार मोडून त्यांच्या घरात आलेय तर दुसरा संसार मांडून द्यायच्या गोष्टी करताहेत ?'(3) प्रतिभा काणेकरांच्या काही कथामधूनही स्त्रीलंपट पुरुषप्रतिमा साकारलेल्या दिसतात. 'मी तुझा मामा दे मला मुका' असे म्हणत सोळा वर्षाच्या भाचीच्या शरिराशी घासाघीस करणारा सुहासमामा (हळवं वय) किंवा काही अघोरी शक्ती जाग्या केल्यावर तुम्हांला मूल होईल असं सांगून स्वतःची भूक भागवण्याचा प्रयत्न करणारा ६० वर्षीय नाना (उगवतीची संध्याकाळ) अशा कित्येक पुरुषप्रतिमा त्यांच्या कथांमधून येताना दिसतात. पण त्याचबरोबर आपल्यासारखीच आपली बायकोही धडाडीची झाली पाहिजे ती समाजात पुढे झाली पाहिजे म्हणून प्रसंगी मुलांनाही सांभाळणारा नंदू सारखा पुरुषही त्यांनी 'आत्मखूण शोधताना' सारख्या कथेत साकारला आहे.

गौरी देशपांडे सारख्या लेखिकेने तरबायकोसमोर साळसूदपणे वागणारे व बाहेर स्त्रियाभोवती पिंगा घालणारे मेहरोत्रासारखे (मध्यलटपटीत) पुरुष तर रेखाटलेच, पण त्याचबरोबर स्त्रियांसमोर हतबल ठरलेले पुरुषही त्यांनी आपल्या कथांमधून रेखाटले, त्यांच्या 'सोन्याचा तुकडा' या कथेतील नवरा कथानायिकेला म्हणतो, 'तू म्हणजे मला समजतच नाहीस बघ. स्वतःत घट्ट मिटून बसून अगदी तुला हवा तेवढाच इतर जगाशी संपर्क साधतेस स्वतःला हवं

तेव्हा हात लांब करून घेतेस. मला हवं म्हणून तसूभर बाजूला होऊन जागा करणार नाहीस.'(4) अशा बंडखोर भूमिकांमुळे गौरी देशपांडे यांच्या कथेतील पुरुष पात्रे बिनचेहऱ्याचीच असल्यासारखी वाटतात. कधी तो गरीब बिचारा तिच्यावर भक्ती करणारा भाबडा असतो तर कधी वेसणीची आवड असणारा बैलोबा असतो. कधी मॉडर्न असूनही हिंदीच ठरतो तर कधी 'कुणास ठाऊक' मधील नायकासारखा इंग्रजी कादंबऱ्या लिहिणारा असूनही तिच्यासमोर विलक्षण नरमाई पत्करतो. परंतु अशा स्त्रियांचे वर्चस्व पुरुषांना कधीच मान्य नसते. म्हणून उषा दातार यांच्या 'एक होती अंबा' या कथेतील स्वयंभू अंबेचे तेज भीष्म कधी मान्य करीत नाही. समाजपुरुष अजूनही महाभारतात गिरगिरतोय. स्त्रीचा पराक्रम, वरचष्मा त्याला कधी मानवतच नाही. तो नाना तऱ्हानी तिची चेष्टा मांडतो. किळसवाणं तृतीयपंथी जिणं तिच्या माथी मारतो.' ना स्त्रियांत स्थान ना पुरुषांत मान'. सध्याच्या युगात स्त्री देहाला जे केवळ भोगाचे वस्तूमूल्य प्राप्त झाले आहे अशा पुरुषसत्ताक भोगवादी विचारधारेचा पद्मजा फाटक यांनी जहाल शब्दात उपहास केला आहे. त्यांची नायिका म्हणते, 'मालकाच्या परवानगीवाचून कालवड गाभणही राहू शकत नाही आणि गर्भपातही करू शकत नाही. शरीर आपलं, इतर हक्क त्याचे, नावही त्याचेच आणि एवढी वसूली करून ऐनवेळी तो आपला नामानिराळाच'.(5)चाळीशीनंतर का होईन आपल्याला आलेले गर्भारपण स्त्रियांना अपत्यप्राप्तीचा किती आनंद देऊन जाते पण पुरुष मात्र त्याकडे सामाजिक संकेतसरणीच्याच चौकटीतून पाहतात व त्यासाठी गर्भपात करवून घेण्याचा विचार करतात. अशी समाजाला घाबरून स्वतःचं सुख बाजूला सारणारी पुरुषीप्रवृत्ती वसुधा पाटील यांच्या 'भार' सारख्या कथेतून येताना दिसते. मेघना पेठेंच्या कथांमधून तर बाहेर स्त्रीमुक्तीची भाषणे देणारा पण स्वतःच्या पत्नीला संसाराशी आणि घराच्या उंबऱ्याशी बांधून ठेवणारा (आस्था आणि गवारीची भाजी), सख्ख्या बहिणीला एक स्त्री म्हणून दुय्यमत्व देणारा भाऊ अशी वेगवेगळ्या प्रवृत्तीची पुरुषपात्रे येताना दिसतात.

काही लेखिकांच्या कथामधून समंजस, निखळ मैत्री जोपासणारे पुरुषही येताना दिसतात, गौरी देशपांडेंचे 'तेरिओ' सारखे पात्र निखळ मैत्रीचे प्रतीक म्हणून येते तर सानियांच्या कथांमधून प्रसंगी घरकामात मदत करणारे समंजस पुरुष तर येतातच पण त्याचबरोबर ऑफिसच्या मित्राबरोबर एकरात्र राहून आलेल्या आपल्या पत्नीची चूक समाजासमोर न आणता किंवा तिचा, मारझोड न करता अगदी समजूतदारपणे ती गोष्ट दोघांच्यातच मिटविणारा व पुन्हा तेवढ्याच प्रेमाने पत्नीला मिठीत घेणारा पुरुषाचा एक नवा चेहराही येताना दिसतो. (वाटा) एका बाजूला स्त्रीकडे फक्त सौंदर्योपभोगाची वस्तू म्हणून पाहणारे व आपली सुंदर बायको कायम सुंदरच दिसली पाहिजे या भूमिकेतून तिला मातृत्वाच्या सुखापासूनही वंचित ठेवणारे सौंदर्यपिपासू पुरुष प्रतिमा इंगोले यांच्या 'हव्यास' सारख्या कथेतून येताना दिसतात, तर दुसऱ्या बाजूला आपण अपत्यहीन आहोत याचं स्वतःचं दुःख बाजूला ठेवून पत्नीला आधार देण्यासाठी स्वतः लहान मूल बनून तिला क्षणिक का होईना सुख देणारे पुरुष सरिता पदकींच्या 'फुगे' सारख्या कथेतून भेटतात. एकंदरीत स्त्रियांच्या कथेतील पुरुषांच्या चित्रणाचा विचार करता त्यांनी पुरुषांच्या चांगल्या-वाईट दोन्ही बाजूंचा विचार केलेला दिसतो.

**समारोप**

अशाप्रकारे सुरुवातीपासून आतापर्यंतच्या स्त्रियांच्या कथालेखनाचा अभ्यास करता त्यांनी स्त्रियांचेच अनुभवविश्व आपल्या कथालेखनातून साकारलेले दिसते. स्त्री-पुरूष सहजीवन, कुटुंबसंस्था आणि सार्वजनिक जीवनव्यवहारातील पुरुषसत्ताक शोषणाचे आकृतिबंध उघडे पाडणारा असा आशयच त्यांच्या कथातून येताना दिसतो. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रियांना जसे गौण स्थान मिळत होते तसेच आपल्या कथालेखनातून त्यांनी पुरुषांना दुय्यम स्थान दिलेले दिसते. असे जरी असले तरीसुध्दा स्त्री लेखिकांनी पुरुषांची विकृती समाजासमोर आणली असे नाही तर त्यांनी भोगवदी पुरुष जसे रेखाटले तसेच निखळ मैत्री जोपासणारे पुरुषही रेखाटले. अन्याय, जुलूम करणाऱ्या पुरुषांप्रमाणे समंजस, प्रसंगी बायकोला मदत करणारे पुरुषही रेखाटले. आपल्या पत्नीचे सौंदर्य टिकून राहावे म्हणून तिला मातृत्व सुखापासून वंचित ठेवणारे पुरुष जसे रेखाटले तसेच आपल्याला मूल होऊ शकत नाही या दुःखात असलेल्या पत्नीचे अश्रू पुसणारे पुरुषही या लेखिकांनी आपल्या कथांतून रेखाटले. एकंदरीत पुरुषांची फक्त एकच विकृत बाजू उजेडात न आणता त्यांच्या दोन्ही बाजू स्त्री लेखिकांनी आपल्या कथांतून समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु आरंभकाळापासून विचार करता फक्त पुरुष हे जुलमी, अत्याचार करणारे असा चेहराच स्त्रियांच्या कथांतून आलेला दिसतो. परंतु आधुनिक लेखिकांनी पुरुषांचे काही वेगळे चेहरेही समाजासमोर आणण्याचा महत्तवपूर्ण प्रयत्न केलेला दिसतो. बदलत्या काळात जेव्हा स्त्री स्वावलंबी झाली, तेव्हा पुरुषाच्या पारंपरिक मानसिकतेला बसलेले धक्के आणि त्यातून निर्माण होणारा त्याचा आंतरिक संघर्ष लेखिकांनी अत्यंत संवेदनशीलतेने टिपला आहे. आजच्या कथांमधील पुरुष केवळ 'शोषक' राहिलेला नाही, तर तो स्त्रीचा सहप्रवासी आणि मित्र होऊ पाहणारा 'नवा पुरुष' म्हणून समोर येत आहे. स्त्रियांनी रेखाटलेला हा पुरुष अधिक वास्तववादी असून तो लिंगभावाच्या (Gender) पारंपरिक चौकटींना छेद देतो. शेवटी, स्त्रियांचे कथालेखन पुरुषांकडे पाहण्याचा एक नवा मानवीय दृष्टिकोन देते, हा या शोधनिबंधाचा मुख्य निष्कर्ष आहे.

**निष्कर्ष**

१. स्त्री लेखिकांच्या कथांमधील पुरुष 'सत्ताधारी कुटुंबप्रमुख' या पारंपरिक प्रतिमेकडून 'संवेदनशील सहप्रवासी' या आधुनिक प्रतिमेकडे सरकला आहे.

२. पुरुषांचे केवळ बाह्य रूप न रंगवता, त्यांच्या मनातील असुरक्षितता, भीती आणि पितृसत्ताक पद्धतीमुळे होणारी त्यांची घुमत लेखिकांनी प्रभावीपणे मांडली आहे.

३. पुरुष हा केवळ 'खलनायक' किंवा 'देवमाणूस' नसून तो गुणदोषांसह जगणारा एक सामान्य माणूस आहे, असे वास्तववादी चित्रण स्त्रियांच्या कथांमधून ठळकपणे समोर आले आहे.

४. बदलत्या काळात स्त्रीच्या स्वावलंबनामुळे पुरुषांच्या मानसिकतेत होणारे बदल आणि त्यातून निर्माण होणारा नवा स्त्री-पुरुष संवाद या कथांनी अधोरेखित केला आहे.

५. स्त्रियांनी रेखाटलेला पुरुष हा लिंगभावाच्या पारंपरिक चौकटी मोडून मानवी मूल्यांना महत्त्व देणारा 'नवा पुरुष' म्हणून आकाराला येत आहे.

**संदर्भग्रंथ**

१) सोमण, अंजली, “मराठी कथेची स्थितिगती", प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. कृ. १००

२) तत्रैव, पृ. कृ. १०९

३) तेंडुलकर, प्रिया, 'ज्याचा त्याचा प्रश्न', डिंपल प्रकाशन, पुणे. पृ. कृ. १०४-१०५

४) देशपांडे, गौरी, 'आहे हे असं आहे', मौज प्रकाशन, मुंबई पृ. कृ. १६

५) दातार, उषा,काचेची भिंत, मनोहर ग्रंथमाला, पुणे. , पृ. कृ. १२१